# देशदूत

शिल्पकार विकासाचा...

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | धुळे | वर्ष २७ । अंक २७१ । सोमवार, दि. १५ जुलै २०२४ । पाने ८ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा Android व Apple वर


## माजी न्यायमूर्ती भाजपमध्ये

**भोपाळ ।** मध्य प्रदेश उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती रोहित आर्य यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. मध्यप्रदेश भाजपाचे प्रदेशाध्यक्ष राघवेंद्र शर्मा व उपमुख्यमंत्री राजेंद्र शुक्ला यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश कार्यक्रम पार पडला. न्यायमूर्ती आर्य यांनी १९८४ मध्ये वकील म्हणून आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली. २००३ मध्ये त्यांची मध्य प्रदेश उच्च न्यायालयाचे वरिष्ठ वकील म्हणून नियुक्ती झाली. न्यायमूर्ती आर्य यांनी केंद्र सरकार, आयकर विभागासाठी महत्वाचे खटलेही लढवले.

## मणिपूरमध्ये एक जवान शहीद

**नवी दिल्ली ।** मणिपूरच्या जिरीबाम जिल्ह्यात पोलिसांच्या संयुक्त पथकावर गोळीबार झाल्याची घटना घडली आहे. घात लावून बसलेल्या अज्ञात सशस्त्र हल्लेखोरांनी अचानक केलेल्या या हल्ल्यात एक जवान शहीद झाला आहे, तर तीन पोलीस कर्मचारी जखमी झाले आहेत मिळालेल्या माहितीनुसार, १३ जुलै रोजी जिरीबाम जिल्ह्यातील मोनबुंग गावाजवळ गोळीबार झाला होता. त्यामुळे सीआरपीएफ आणि जिरीबाम जिल्हा पोलिसांचे पथक या परिसरात सर्च ऑपरेशन राबवत होते.

## संपादकीय

### आरोग्याकडे दुर्लक्ष नको

आषाढात श्रावणसरींचा अनुभव येत आहे. मध्येच उन्हाची तिरीप पडते तर क्षणात पावसाची रिपरिप सुरु होते. ठिकठिकाणी अस्वच्छता आढळते. काही ठिकाणी चिखल झाला आहे. रस्त्याच्या कडेला आणि खड्ड्यांमध्ये पाणी साठत आहे. परिणामी डासांचा प्रादुर्भाव वाढत आहे. असे वातावरण साथीच्या रोगांना पूरक मानले जाते. राज्यात डेंगीच्या साथीचा उद्रेक असून झिकाचे रुग्णही वाढत आहेत. डेंग्यूला आळा घालण्याचा दृष्टीने नाशिक महानगरपालिकेतर्फे घरोघरी तपासणी करण्यात येत आहे. तशी ती इतरत्रही सुरु असू शकेल. ही तपासणी प्रभावी कशी ठरेल याची दक्षता घेतली जायला हवी. घरोघरच्या, गच्चीवरच्या पाण्याच्या साठ्यांची थेट तपासणी करण्याची सावधानता घेतली जाईल अशी अपेक्षा. डेंग्यूला आळा घालण्यासाठी स्वच्छतेला पर्याय नाही. कारण डेंग्यूचे डास स्वच्छ पाण्यात तयार होतात. परिसर स्वच्छता हे सरकारचे कर्तव्य आणि लोकांची जबाबदारी आहे. लोकसहभागाशिवाय कोणत्याही साथीच्या रोगाला अटकाव करणे शक्य होऊ शकेल का? यावर्षीच्या राष्ट्रीय डेंग्यू दिवसाची संकल्पना देखील तीच आहे. 'डेंग्यू प्रतिबंध : सुरक्षित उद्याची आपली जबाबदारी' त्याचा विसर लोकांना पडणे म्हणजेच रोगाचा फैलाव वेगाने होणे. कोरडा दिवस पाळणे, पाण्याची भांडी स्वच्छ ठेवणे, परिसरात जुन्या टायरमध्ये, घरात ठेवलेल्या कुंड्यांमध्ये किंवा त्या ठेवलेल्या डिशमध्ये, कुलरमध्ये किंवा फ्रिजच्या मागच्या ट्रेमध्ये पाणी साठणार नाही एवढी काळजी तर लोक नक्की घेऊ शकतात. नव्हे त्यांनी ती घ्यायलाच हवी. रस्त्यावर साठलेल्या पाण्यात पाय घालणे लोकांनी टाळावे. याच काळात सामान्य लोकांना सरकारी आरोग्य व्यवस्थेचा आधार वाटणे स्वाभाविकच. ती व्यवस्था सक्षम राखण्याला सरकारने प्राधान्य द्यायला हवे. पण आरोग्य विभागात सुमारे वीस हजार पदे रिक्त असल्याचे सांगितले जाते. त्यात आरोग्य संचालक, सहसंचालक, जिल्हा शल्यचिकित्सकांसह अनेक पदांचा समावेश आहे. तसे पान २ वर

## केळी भाव

| | |
|---|---|
| नवती (१) | : 1620 |
| नवती (२) | : 1470 |
| पिलबाग | : --- |
| वापसी | : --- |

## मिश्कीली






# गद्दारी माझ्या रक्तात नाही -आ. शिरीष चौधरी

**विधान परिषद निवडणूक**

**काँग्रेस आमदार फूट प्रकरण**

**जळगाव ।** विधान परिषदेच्या १२ जुलै रोजी झालेल्या निवडणुकीत राष्ट्रीय काँग्रेसच्या ७ विधानसभा सदस्यांनी महायुतीला क्रॉस मतदान केले. त्यात काही माध्यमांनी नामोउल्लेख केल्याचे ऐकले. याविषयी मला आश्चर्य वाटले. मात्र, मी पक्षाशी गद्दारी केलीच नाही आणि करणारही नाही. वेळप्रसंगी राजकारण सोडेन. मात्र, गद्दारीचा डाग लागू देणार नाही, अशी माहिती रावेरचे काँग्रेसचे आमदार शिरीष चौधरी यांनी रविवारी काँग्रेस भवनात आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

आमदार शिरीष चौधरी पुढे म्हणाले की, माझा परिवार स्वातंत्र्यपूर्व १९३१ पासून काँग्रेस पक्षाशी निगडीत आहे. माझे आजोबा कै.धनाजी नाना चौधरी ब्रिटीश सरकारची शासकीय नोकरी लाथाडून काँग्रेसच्या विचारसरणीत सामिल झाले व स्वातंत्र्य संग्रामात त्यांनी आयुष्य वाहून घेतले. सन २००९ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीत मी अपक्ष निवडून आलो. इतर पक्षांच्या वेगवेगळ्या आमिषांना बळी न पडता मी तत्कालीन काँग्रेसच्या सरकारला बिनशर्त पाठिंबा दिला. कारण माझ्या परिवाराची नाळ माझ्या जन्मापासून काँग्रेस पक्षाशी जुळलेली आहे. गद्दारी, फितुरी आमच्या रक्तातच नाही. त्यामुळे मी पक्षाचा आदेश सिरसावंद्य मानतो. मागील अडीच वर्षे माझ्या मतदारसंघातील रस्ते, उपजिल्हा नागरी सुविधा या महत्वाच्या कामांचा सातत्याने पाठपुरावा करूनही त्यासाठी मला निधी मिळाला नाही. केळी उत्पादकही भरमसाठ जी.एस.टी. भरतात. पण त्याचे मुलभूत प्रश्नही दुर्लक्षित आहेत. जनतेचा पैसा जनतेलाच मिळत नाही, हा माझ्या मतदारसंघातील जनतेवर अन्याय आहे. निधी मिळावा म्हणून मी पाठपुरावा करतो. माझ्या परिवाराने त्याग व बलिदान दिलेले आहे. मी पक्षाशी गद्दारी केली नाही. मी माझ्या मतदार संघातील जनतेला आश्वस्त करू इच्छितो की, मी असे चुकीचे काम केलेले पान २ वर

### माझ्या बदनामीचा डाव

माझी बदनामी करून स्वत:ची पोळी भाजण्याचा हा प्रकार आहे हे लक्षात घ्यावे, काँग्रेस पक्ष श्रेष्ठींना फुटलेल्या विधानसभा सदस्यांची नावे माहिती असून ती त्यांनी जाहीर करावी म्हणजे सत्य जनतेसमोर येईल आणि नाहक होणारी बदनामीही थांबेल. पक्षश्रेष्ठींनी सदर नावे जाहीर करावी, असे आवाहनही आ.चौधरी यांनी केले.

# हवसे, नवसे, गवसे येतील पण...

## बारामतीमधून अजितदादांचा खोचक टोला





**बारामती ।** विधानसभेला महायुतीला निवडून द्यायचे आहे, हवसे, नवसे, गवसे येतील, पण अजित दादा हा शब्द देणारा असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज बारामतीमध्ये केले. बारामतीमध्ये राष्ट्रवादी अजित पवार गटाची जन सन्मान रॅली आयोजित करण्यात आली होती. या रॅलीमध्ये बोलताना अजित पवार यांनी खोचक शब्दांमध्ये शरद पवार, सुप्रिया सुळे, रोहित पवार यांच्यावर टीका केली. भावनिक होऊन प्रश्न सुटत नाहीत. विकासाचे ध्येय ठेवून पुढे जायचे आहे. मला बारामती बघत इतर तालुके, पुणे, महाराष्ट्र फिरायचा आहे. इथल्या लोकांनी जबाबदारी पाळायचे असल्याचे अजित पवार म्हणाले.

कांदा, दूध पावडर आयात केलेली नाही. जगाची आर्थिक राजधानी मुंबई करायची आहे. चुकीच्या प्रचारावर जो काही नॅरेटिव्ह सांगण्याचा प्रयत्न करतील, त्यावर विश्वास ठेवू नका असे अजित पवार यांनी सांगितले. जनसन्मान मेळाव्यामधून प्रत्येक जिल्हा तालुका ढवळून काढायचा असल्याचे अजित पवार म्हणाले.

### संविधानाला धक्का लावणार नाही

अजित पवार म्हणाले की, चंद्र आणि सूर्य आहे तोपर्यंत संविधानाला कोणी धक्का लावणार नाही. आम्ही खोटे बोलणार नाही. आम्ही सत्तेसाठी हपापलेलो नाही. सत्ता येत असते, जात असते. सत्तेचा ताम्रपट घेऊन कोणी आलेला नाही. सत्तेचा वापर गरिबांसाठी झाला पाहिजे, मी काल अमित शाह यांची भेट घेतली व साखरेच्या संदर्भात त्यांच्याशी बोलणी केली. एमएसपी वाढवायला पाहिजे असे त्यांना सांगितले. त्या संदर्भातील निवेदन त्यांना उद्या देणार असल्याचे अजित पवार म्हणाले.



## वारकरी महामंडळाची स्थापना

### पंढरपुरात मुख्यालय, ५० कोटींची तरतूद!

**पंढरपूर ।** महाराष्ट्र सरकारकडून मुख्यमंत्री वारकरी महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. मुख्यमंत्री वारकरी महामंडळाचे मुख्यालय पंढरपूर येथे असेल. या महामंडळावर कार्यरत किंवा सेवानिवृत्त भारतीय प्रशासन सेवतील अधिकाऱ्याची व्यवस्थापकिय संचालकपदी नियुक्ती करण्यात येणार आहे. या मुख्यमंत्री वारकरी महामंडळासाठी ५० कोटींची तरतूद शासनाकडून करण्यात आली आहे. मंत्रिमंडळाच्या दिनांक ११ जुलै रोजी झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री वारकरी महामंडळ स्थापन करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे. आज राज्य सरकारकडून याबाबत आज अधिकृत अधिसूचना जारी करण्यात आली आहे.

आषाढी वारी म्हणजे आषाढी एकादशी निमित्त महाराष्ट्रातील वारकरी भक्तांनी विविध गावांपासून पंढरपूर पर्यंत केलेली सामुदायिक पदयात्रा होय. वारीनिमित्त लाखो वारकरी प्रतिवर्षी पंढरपूर येथे जमतातच, परंतु पंथाची दीक्षा न घेतलेले अनेक विठ्ठलभक्तही येतात. आंध्र-कर्नाटकांतून येणाऱ्यांची संख्याही मोठी असते. वारी ही आषाढ आणि कार्तिक महिन्यातील शुध्द एकादशी अशा दोन वेळा होते. त्र्यंबकेश्वर येथून संत निवृत्तीनाथांची, शेगाव येथून संत गजानन महाराज यांची वारी दरवर्षी निघत असते. तसेच पुढील संतांच्या पालख्या महाराष्ट्रातुन वेगवेगळ्या ठिकाणा वरुन मार्गस्थ होत असतात.



मुंबई : माजी केंद्रीय मंत्री मेनका गांधी यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आज सकाळी सागर निवासस्थान, मुंबई येथे सदिच्छा भेट घेतली.

# डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर गोळीबार; सुदैवाने बचावले



**वॉशिंग्टन ।** अमेरिकेत माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर भर सभेत गोळीबार झाला.ज्याने गोळीबार केला त्याला ठार करण्यात आले आहे. या हल्लेखोराने १२० मीटर लांबीवरुन ट्रम्प यांच्यावर गोळी झाडली होती. तिथे तैनात असलेल्या यूएसच्या सिक्रेट सर्व्हिसच्या काऊंटर स्नायपर्सने या हल्लेखोराला ठार केले आहे.

हल्लेखोराचे नाव थॉमस मॅथ्यू क्रुक्स असल्याची माहिती समोर आली आहे. हा २० वर्षीय तरुण बेथखेल पार्क पेन्सिल्वेनियाचा राहणारा होता. घटनास्थळावरुन एक एआर-१५ सेमी ऑटोमॅटिक रायफलही जप्त करण्यात आली आहे. याच रायफलने ट्रम्प यांच्यावर गोळीबार झाल्याची शक्यता आहे. या गोळीबाराला उत्तर देताना काऊंटर स्नायपर्सची गोळी थेट हल्लेखोराच्या डोक्यात लागली आणि त्याचा जागीच मृत्यू झाला.

अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे त्यांच्या प्रचार सभेत भाषण देत होते. तिथून सुमारे १२० मीटर लांब एका मॅन्युफॅक्चरिंग कंपनीच्या छतावर एक व्यक्ती बंदूक घेऊन उभा होता. त्याने थेट ट्रम्प यांच्यावर निशाणा साधला आणि गोळी झाडली. ट्रम्प यांचे ओपन-एअर कँपेन हे बटलर फार्म शो ग्राऊंडवर आयोजित करण्यात आली होती. मोकळी जागा असल्याने आरोपीला निशाणा साधणे सोपे झाले. हल्लेखोर जिथे उभा होता तिथून ट्रम्प यांच्यावर थेट निशाणा साधला जाऊ शकत होता.

### राजकारण अन् लोकशाहीत हिंसेला थारा -मोदी

ट्रम्प यांच्यावरील या हल्ल्यानंतर भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक्सवर एक पोस्ट करून या हल्ल्याचा निषेध नोंदवला आहे. तसेच ट्रम्प लवकरात लवकर बरे व्हावेत यासाठी प्रार्थना केली. या हल्ल्यावरून मोदी यांनी चिंता व्यक्त केली. यासह राजकारण आणि लोकशाहीत हिंसेला थारा नाही. अशा शब्दांत मोदी यांनी या हल्ल्याचा निषेध नोंदवला. मोदी यांनी म्हटले आहे की माझे मित्र व अमेरिकेचे माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ल्यामुळे मी चिंतेत आहे. मी या हल्ल्याचा तीव्र निषेध करतो. राजकारण व लोकशाहीत हिंसेला थारा नाही. ट्रम्प लवकरात लवकर बरे व्हावेत यासाठी मी प्रार्थना करेन. आम्ही या हल्ल्यात निधन झालेल्या लोकांच्या कुटुंबियांबरोबर आहोत. तसेच या हल्ल्यात जखमी झालेले अमेरिकन नागरिक लवकर बरे व्हावेत यासाठी प्रार्थना करतो.

# ....तर थोडं वेट अँड वॉच करावे लागेल

## गुलाबराव पाटलांचे मनोज जरांगे पाटलांना आवाहन



**जळगाव ।** हैदराबादच्या नोंदी आणायच्या असतील तर थोडं वेट अँड वॉच करावे लागेल. ओबीसी आणि मराठा समाज हा आजपर्यंत कायम भाऊबंदकीसारखा राहिला आहे. यापुढेही कायम राहिला पाहिजे असेच त्यांनी पुढचे निर्णय घ्यावे, असे आवाहन ना. गुलाबराव पाटील यांनी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाच्या इशाऱ्यानंतर केले आहे.

सरकारने जर आरक्षण दिले नाही तर स्थगित केलेले उपोषण आंतरवालीत २० तारखेला पुन्हा सुरु करणार आहे. आता कठोर उपोषण होईल. आता मेलो तरी माघार नाही. पण मराठ्यांवर गुलाल मी टाकणार आहे, असा इशारा मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला दिला. याबाबत गुलाबराव पाटील म्हणाले की, आरक्षणासाठी सरकार ज्या पद्धतीने शक्य होईल, त्या पद्धतीने काम करत आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या काळामध्ये आरक्षण दिले होते. मात्र, कालांतराने ते टिकले नाही. आताही सरकारमधील सर्व मंत्री, दोन उपमुख्यमंत्री, मुख्यमंत्र्यांनी दहा टक्के आरक्षण दिलेले आहे.

**हैदराबादच्या नोंदींसाठी काम सुरु**

हैदराबादच्या नोंदी आणायच्या असतील तर थोडं वेट अँड वॉच करावे लागेल.तोडगा काढण्याकरता सरकार सक्रिय आहे. ओबीसी आणि मराठा समाज हे दोघेही भाऊ असल्याने त्यांच्यात कटूता निर्माण होऊ नये. त्यामुळे दोन्ही बाजूने शांतता पाळली पाहिजे, हे मानणारा मी कार्यकर्ता आहे. निवडणुकीत उमेदवार पान २ वर

# ४६ वर्षांनंतर उघडले जगन्नाथाचे रत्न भंडार

## देवाच्या खजिन्याची मान्यवरांच्या उपस्थितीत होणार मोजणी



**पुरी ।** ओडिशातील प्राचीन भगवान जगन्नाथ मंदिराचे रत्न भंडार रविवारी १४ जुलै रोजी ४६ वर्षांनंतर उघडण्यात आले. दार उघडण्याचा शुभ मुहूर्त १:२८ वाजता निश्चित करण्यात आला होता. १९७८ मध्ये शेवटचे रत्न भंडार उघडण्यात आले होते. त्यावेळी एकूण ३६७ दागिने सापडले होते आणि त्याचे वजन ४,३६० तोळे भरले होते. त्यामुळे आता रत्न भांडारात किती खजिना आहे हे समोर येणार आहे. मंदिरातील रत्न भांडार उघडण्यासाठी सकाळपासून तयारी सुरू होती. रत्न भंडार मधील दागिने ठेवण्यासाठी ६ चेस्ट पुरीत पोहोचल्या आहेत. त्या सागवान लाकडापासून बनवलेल्या आहेत. त्यांना आतून धातूचा थर देण्यात आला आहे.

ओडिशातील जगन्नाथ मंदिराचे रत्न भंडार उघडण्यासाठी एक समिती तयार करण्यात आली आहे. न्यायमूर्ती विश्वनाथ रथ हे या समितीचे अध्यक्ष आहेत. रत्न भंडार पुन्हा सुरू करण्यासंदर्भात बैठक बोलावण्यात आली होती. या बैठकीत रत्न भंडार उघडण्याचा निर्णय घेण्यात आला. रत्न भंडार उघडण्याचा आणि त्यामधील दागिन्यांची काळजी घेण्याचा निर्णय यावेळी घेतला गेला. बैठकीत झालेल्या चर्चेनुसार पुरोहित आणि मुक्ती मंडप यांच्या सूचनांनुसार रत्न भांडार उघडण्याची वेळ दुपारी १.२८ वाजता निश्चित करण्यात आली.

रत्न भंडारचे दरवाजे उघडण्याच्या निर्णया संदर्भात माहिती देताना समितीचे अध्यक्ष न्यायमूर्ती पान २ वर


धुळे ■ जळगाव ■ धुळे ■ नंदुरबार ■ नाशिक ■ अहमदनगर येथून एकाच वेळी स्वतंत्रपणे प्रकाशित www.facebook.com/deshdoot www.instagram.com/deshdoot twitter.com/deshdoot Youtube : Daily Newsgram


cmyk